**महाराष्ट्र शासन-जलसंपदा विभाग,**
**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे**
**क्रिडा स्पर्धा सन२०१८**
कार्यकारी संचालक महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिंचनभवन, बारणेरोड, पुणे- ४११०११.
ई-मेल : edmkvdc_pune@wrd.maharashtra.gov.in, दूरध्वनी :०२०-२६१३५२६३.
sipcsatara@rediffmail.com, sipcsports@gmail.com दूरध्वनी :०२१६२-२४४६५४.

---

**जलसंपदाविभाग,क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम-२०१८**
**स्थळ:शाहू क्रिडा संकुल,एस.टी.स्टँड शेजारी सातारा.**

**राज्यसतरीय बुध्दीबळ स्पर्धा -**

सर्वसाधारणनियमावली:

१. प्रत्येक खेळाडूकडे शासकीय ओळखपत्र असणे आवश्यकआहे.
२. स्पर्धा पुरुष व महिला गटात वेगवेगळी खेळवण्यात येईल.
३. स्पर्धा आंतरराष्ट्रीय फिडे नियमानुसार साखळी पध्दतीने (स्विस लिग) खेळवण्यात येईल.
४. वेळ:- प्रत्येक खेळाडूला 60 मिनिटे आणि 30 सेकंद प्रत्येक खेळीला जादा मिळेल.
५. टच टू प्ले – स्पर्धकाने ज्या सोंगटीस प्रथम हात लावेल त्याच सोंगटीची चाल करणे आवश्यक आहे.खेळाडूने हात सोडल्यावर त्या खेळाडूची चाल पूर्ण होते.
६. खेळताना दोन्ही हात वापरणे नियमबाह्य (इलिगल) आहे.
७. दोन नियमबाह्य (इलिगल) खेळीस, ती खेळी करणा-या स्पर्धकास त्या डावापुरते बाद/हरला असे घोषीत करण्यात येईल.
८. नियमबाह्य (इलिगल) खेळी झाल्यावर स्पर्धकाने पंचाना/ अर्बिटर बोलावणे आवश्यक आहे. स्पर्धकांनी मोबाईल पूर्णपणे स्वीच ऑफ/ बंद अवस्थेत बॅगेत किंवा टेबलावर ठेवावा. मोबाईल चालू अवस्थेत आढळल्यास किंवा त्याचा आवाज आल्यास त्या खेळाडूला त्या डावापुरते बाद/हरला असे घोषीत करण्यात येईल.
९. स्पर्धकांनी डाव सुरु करायच्या आधी आपला प्रतिस्पर्धी खेळाडू आणि टेबल नंबर बरोबर आहे का ते समोरच्या प्रतिस्पर्धी खेळाडूला विचारुन आणि पेअरिंग लिस्ट बघून खात्री करुन बसावे. चुकीच्या टेबलवर बसल्यास किंवा प्रतिस्पर्धी खेळाडूशी खेळल्यास गुण मिळणार नाही.
१०. स्पर्धकांनी प्रत्येक वेळी डाव झाल्यावर दोघांनी मिळून येऊन निकाल देणे आवश्यक आहे. एकटे आल्यास निकाल घेतला जाणार नाही.
११. स्पर्धा हॉलमध्ये प्रॅक्टीस गेम/ सराव डाव किंवा डाव विश्लेषण करण्यास सक्त मनाई आहे. असे आढळल्यास त्या खेळाडूंना स्पर्धेतून बाद करण्यात येईल.
१२. सर्व खेळाडूंनी स्पर्धेत सर्व डाव खेळणे आवश्यक आहे.
13. पंचांचा निर्णय अंतिम राहील.

**बुध्दीबळ स्पर्धा मुख्य पंच** :- श्री. प्रणव टंगसाळे(राष्ट्रीय पंच)

**सहाय्यक पंच** :- सौ. पूनम जाधव (राज्य पंच), सौ. मनिषा जाधव (राज्य पंच)

**मार्गदर्शक** :- श्री. जयंत उथळे सर